# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(सकाळ)**

जा.क्र. ६३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०९/२०१७

**१) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/०९/२०१७ चे ०२.०० ते ०२.३० वा दर. यातील फिर्यादी ही आरोपी क्र. १ व २ ची भाची असुन तिचे पती सोबत पटत नसल्याने मागील २ महीण्या पासुन आरोपीच्या घरी राहत असुन फिर्यादी ही आरोपी क्र. २ सोबत झोपली असता आरोपी क्र. १ ने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे उजवे पायाचा चुम्मा घेतला असता फिर्यादीने लाथ मारली असता आरोपी क्र. १ हा पळुन गेला व आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन सदरची घटना कोणाला काही सांगायची नाही असे म्हणुन ५ दिवस घरातुन बाहेर निघुन दिले नाही व जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३५४(अ)(१),३४३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०९/२०१७ चे १३.०० वा ते दिनांक ११/०९/२०१७ चे १८.३० वा दर. यातील फिर्यादी ही घरी एकटी आरोपी क्र. १ ने तिला गोड खर्रा घे म्हणुन घरी बोलावुन अश्लिल कृत्य करून, तु ही गोष्ट कोणाला सांगु नको, सांगीतले तर तुला गावात ठेवणार नाही व तुझा घर पेटवुन देईल अशी धमकी दिली तसेच फिर्यादीची आई दिनांक ११/०९/२०१७ ला गावी जावुन तु माझ्या मुलीसोबत असे का केला असे हटकले असता आरोपी क्र. २, ३ यांनी संगनमत करुन थापड बुक्यांनी मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे आईचे एमएलसी रिपोर्ट व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५४(अ)(१),३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लांडे पो. स्टे कारधा हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलगा घरून निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०९/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा हा घरी कोणालाही न सांगता घरून निघुन गेला, त्याचा शोध नातेवाईकात घेतला असता मिळुन आला न आल्यने त्यास कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे, असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**४) भांडण व शिवीगाळ करून, विटाने मारून जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक ११/०९/२०१७ चे १९.४५ वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीस तु मला मागील दिवशी काय म्हटलास, या कारणावरून भांडाण, शिवीगाळ करून हातात विटेचा तुकडा घेवुन फिर्यादीच्या डोक्यावर डावे बाजुला कानाच्या वर मारून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी उदास गणपत घरट वय ४३ रा. तिररी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**५) एटीएम मशिन मधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १०/०९/२०१७ चे १३.२८ ते १३.३१ वा. दर. यातील फिर्यादी बाबुराव गणपत राघोर्ते वय ६७ वर्ष रा.समर्थ नगर लाखनी हा बॅक ऑफ महाराष्ट्र भंडारा बॅकच्या एटीएम मध्ये पैसे काढण्यास गेला असता फिर्यादीचे मागे उभा असलेला एक अनोळखी आरोपीने फिर्यादीला तुमचे बॅलेन्स चेक करा असे म्हटल्याने फिर्यादी आपले एटीएम मशिन मध्ये टाकुन बॅलेन्स चेक करीत असता, यातील अनोळखी आरोपी इसमाने फिर्यादीचे एटीएम पासवर्ड बटनला हात लावुन फिर्यादीचे खात्यामधुन नगदी १०,०००/रु काढुन फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भांदवि. सहकलम ६६(क) माहीती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. तेलुरे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**६) जाण्या येण्याच्या रस्त्याच्या वादावरुन भांडण करुन मारण्याची पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ११/०९/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी रतीराम बकाराम शिवनकर वय ८२ वर्ष रा. डोंगरगाव याचा नातु नितीन शिवनकर हा शेतातुन गवत आनण्याकरीता रोडाने ट्रॅक्टर घेवुन जात असतांनी यातील आरोपीने ट्रॅक्टर अडवुन येथुन तुमचा जाण्या येण्याच्या रस्ता नाही म्हणुन भांडण करून मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी, यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३४१,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे पांलादुर हे करीत आहेत.

**७) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यानी मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०९/२०१७ चे १९.०० ते १९.३० वा. दर. यातील फिर्यादी महेन्द्र गजभिये वय ४२ वर्ष, रा. शुक्रवारी वार्ड पवनी याचा मित्र घरी आला असता मित्रा समोर फिर्यादीचे पत्नीने शिवीगाळ केली असता फिर्यादीने पत्नीला माझ्या मित्रा समोर माझी बदनामी करुन नको असे बोलत असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फियादीचे घरात येवुन फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन दारु पिऊन माझ्या बहीनीला त्रास का देतोस असे बोलुन थापड बुक्यांनी मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,२९४,३२३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**८) अवैध दारू अडयावर धाडी . :—**

दिनांक १२/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा, सिहोरा व पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून २७ लिटर हा.भ. दारू किंमती १९००/—रु. तसेच १७ लिटर २८० किमती ४९९२/—रु. असा एकुण किंमती ६८९२/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १२/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.